# ई-तंत्रज्ञान...

## पीसीएमसीचा यशोमंत्र

(पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची ई-प्रशासन यंत्रणा)



माधुरी यादवाडकर

Scanned with CamScanner

**ई-तंत्रज्ञान...पीसीएमसीचा यशोमंत्र**

- **लेखिका** : माधुरी यादवाडकर

- **पहिली आवृत्ती** : जून २०१४

- **प्रकाशक** : डॉ. किरण कुलकर्णी
५०५, बी विंग, ५ वा मजला, एमसीसीआयए ट्रेड टॉवर,
सेनापती बापट रोड, पुणे -४११ ०१६
फोन: ०२०-२५७०९२७५
kirank@mcciapune.com
www.janwani.org

- **मुद्रक** :
स्वानंद ट्रेडर्स पुरंदरे लेन, डेक्कन जिमखाना,
पुणे -४११ ००४.

- **देणगी मूल्य : ५०/-**

**सदर पुस्तिका पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ई-प्रशासन प्रणालीविषयी माहिती देण्याच्या उद्देशाने प्रकाशित करण्यात येत आहे. त्यामध्ये व्यक्त करण्यात आलेले विचार हे संबंधित लेखिकेच्या अनुभवांवर आधारित आहेत, याची नोंद घ्यावी.**

Scanned with CamScanner

## भूमिका



**'जनवाणी'** हा मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड ॲग्रीकल्चरची (MCCIA) सामाजिक संस्था २००६ पासून कार्यरत आहे. वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या अभ्यासणे, त्या अनुषंगाने नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा अभ्यास करणे आणि त्यादृष्टीने प्रकल्प राबवून उपाय सुचवणे, हा जनवाणीचा हेतू आहे. गेल्या आठ वर्षांत पर्यावरण (Environment), वाहतूक (Traffic and Transportation), नगर रचना (Urban Planning), ऊर्जा (Energy), सुप्रशासन (Governance) आणि वारसा (Heritage) या मुख्य नागरी विषयांवर जनवाणीने लक्षणीय प्रकल्प राबवले आणि त्यात नव्या उपक्रमांची भर पडत आहे.

कात्रज येथील 'शून्य कचरा प्रणाली' प्रकल्पाचा यशस्वी प्रयोग आणि त्याच धर्तीवर इतर २० प्रभागात अनुकरणाचा प्रयोग, पुण्याची पहिली वारसा पदयात्रा (heritage walk), पुणे बस गाइड, अपघात नोंदणी प्रणाली (accident report system), सहभागी अंदाजपत्रक (participatory budgeting) आणि इतर अनेक अभिनव आणि नागरिकांच्या रोजच्या गरजांशी निगडीत प्रकल्प 'जनवाणी'ने यशस्वीरीत्या राबवले आहेत.

कोणत्याही प्रकल्पाला सुरुवात करण्याआधी त्या विषयाचा सांगोपांग अभ्यास करून संबंधित सर्व घटकांच्या भूमिका निश्चित करणे आणि सर्व घटकांना एकत्र आणून व्यावहारिक प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी करणे, असे 'जनवाणी' चे धोरण आहे. याबाबत शासन, महानगरपालिका प्रशासन, स्वयंसेवी संस्था, नागरिक आणि उद्योगविश्व अशा समाजाच्या सर्वच घटकांशी 'जनवाणी' चा संवाद आहे. त्यातून सर्वच घटकांच्या परस्परपूरक गरजा आणि भूमिका यांचे वास्तव चित्र

डोळ्यांसमोर ठेऊन 'जनवाणी'च्या प्रकल्पाची आखणी आणि अंमलबजावणी होत असते. या पार्श्वभूमीवर 'ई-प्रशासन प्रणाली' या जिव्हाळ्याच्या विषयावर सोप्या भाषेत आणि सर्वांना उपयुक्त ठरेल, अशी पुस्तिका काढण्याचे 'जनवाणी' ने ठरवले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने माजी आयुक्त डॉ. श्रीकर परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली (पीसीएमसी) या आधुनिक प्रणालीचा व्यापक प्रमाणात उपयोग सुरू केला. विद्यमान आयुक्त श्री. राजीव जाधव यांनीही या प्रणालीला प्रोत्साहन दिले आहे. उपलब्ध संसाधनांचे नियोजन करणे, व्यवस्थापन यंत्रणा सक्षम करणे आणि नागरिकांना सर्व सेवांची सोप्या भाषेत माहिती उपलब्ध करून देणे, या हेतूने ई-प्रशासन ही यंत्रणा सुरू झाली आणि त्याचे सकारात्मक पडसाद दिसू लागेल आहेत. या प्रणालीसाठी पीसीएमसीला अनेक पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. अर्थात, अजूनही या प्रणालीचा योग्य प्रसार, प्रचार आणि वापर होणे गरजेचे आहे. सामान्य नागरिकांच्या मनात प्रशासनाविषयी भरपूर संभ्रम आणि शंका असतात. त्यादृष्टीने जनजागृती करणे आणि जास्तीत जास्त लोकांना ई-प्रशासन प्रणालीचा वापर करण्यास प्रवृत्त करणे, हा या पुस्तिकेचा हेतू आहे. लेखिकेने सर्वसामान्य नागरिकांच्या नजरेतून या प्रणालीचा अभ्यास केला, संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि ई-प्रशासनाची उपयुक्तता तपासून पहिली. या सर्व अनुभवाचा परिपाक म्हणजे ही पुस्तिका आहे. नागरिक आणि प्रशासकीय अधिकारी दोघांनाही ही छोटीसी पुस्तिका उपयोगी ठरेल, असा विश्वास मी व्यक्त करतो.

जनवाणीच्या सीएआर कन्सल्टंट स्नेहा जाजू आणि मीडिया कन्सल्टंट सुप्रिया शेलार तसेच एमसीसीआयएचे श्री. प्रमोद पोटभरे यांनी या पुस्तिकेच्या निर्मितीसाठी केलेल्या प्रयत्नांसाठी त्यांचेही आभार. पिंपरी-चिंचवडच्या अधिकाधिक नागरिकांनी या पुस्तिकेचा फायदा करून घ्यावा आणि त्यायोगे स्थानिक प्रशासनाच्या विविध ई-सेवासुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा, हीच अपेक्षा.

**डॉ. किरण कुलकर्णी**, संचालक, जनवाणी

Scanned with CamScanner